साधन संपत्ती निर्धारण व आधार सामग्री विकास
घटक चालू बाब प्रस्ताव सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :-एफडीएम २०१७/प्र.क्र.१९/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १८ जानेवारी, २०१८

वाचावे :- १) शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दि.०८.०१.२०१८
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफडीएम-२०१७/प्र.क्र.१९/फ-२, दि.१८.११.२०१७.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३/ योजनेत्तर/ प्र.क्र.२० /२०१६-१७/१९८३, दि. १९.०१.२०१७

शासन निर्णय :-

साधन संपत्ती निर्धारण व आधार सामग्री विकास या योजनेत्तर योजनेतंर्गत २ अस्थायी पदांना वरील दि. ०३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात आली होती. सदर पदांची मुदत दि.३१.१२.२०१७ रोजी संपुष्टात येत आहे. त्याअनुषंगाने खाली दर्शविलेल्या विवरण पत्रातील २ अस्थायी पदांना वन विभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. ०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

पदनाम	पदसंख्या
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (नियोजन व व्यवस्थापन-वन्यजीव)	१
विभागीय वनअधिकारी (डाटाबेस)	१
एकूण	**२**

२. या अन्वये होणारा खर्च “प्रधान शीर्ष -२४०६-वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर) ०१ वनीकरण १०१ वनसंधारण विकास व पुननिर्मिती (०४) (०१) कार्य आयोजनेची सुधारणा व तयारी (२४०६ ०१४९)” या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ या वर्षी त्याखालील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. या कालावधीमध्ये मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१४००५५०८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 14:09:57 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

<u>प्रतिलिपी</u> :- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
३) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) वित्त विभाग, व्यय १०/अर्थसंकल्प-४/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुबई - ३२.
७) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.